**३४ वी विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परीक्षा**


# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

**दापोली ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)**

Web site: www.dbskkv.org फोन नं. (०२३५८), कार्यालय- २८२४११ ते २८२४१३,

Email- assistantregistrar2@rediffmail.com, फोन नं फॅक्स- ०२३५८-२८३०६५.


जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/आस्था/ब—३/८८६१/२०१७ दिनांक:— 16 OCT 2017

वाचा:— १) परिपत्रक क्र.डॉ.बासाकोकृवि/आस्था/ब—३/सेप्रप—३४/४७/१७, दि.२९ मे, २०१७

२) विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.२४५/१५, दिनांक ८ सप्टेंबर, २०१७.

## परिपत्रक

विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांची ३४ वी विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परीक्षा **शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ ते रविवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ रोजी कृषि महाविद्यालय, दापोली** येथे आयोजित करण्यांत आली आहे. उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकान्वये सेवाप्रवेशोत्तर परिक्षेसाठी अर्ज मागविण्यांत आले होते. त्यानुसार सदर परिक्षेस बसण्यासाठी प्रवेश दिलेल्या उमेदवारांची नावे त त्यांचे आसन क्रमांक इत्यादी माहिती सोबतच्या **'परिशिष्ट—अ'** मध्ये दर्शविण्यांत आली आहे. या अगोदर परिक्षेत मिळालेल्या गुणांनुसार विषयामध्ये सूट मिळालेल्या उमेदवारांची नावे सोबतच्या **'परिशिष्ट—ब'** मध्ये आणि परिक्षेचे स्थळ व वेळापत्रक, इत्यादी माहिती सोबतच्या **'परिशिष्ट—क'** मध्ये दर्शविण्यांत आली आहे. त्याचप्रमाणे परिक्षेच्या वेळी उमेदवारांनी पाळावयाच्या सूचना सोबतच्या **'परिशिष्ट—ड'** मध्ये दर्शविण्यांत आल्या आहेत.

सर्व कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक परिक्षेला प्रवेश दिलेल्या सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणून, त्याविषयी त्यांची स्वाक्षरी घेण्यांत यावी. तरी सर्व उमेदवारांना परिक्षेचा कार्यक्रम निदर्शनास आणला जाईल याची त्या त्या आस्थापना शाखेनी विशेष दक्षता घ्यावी. तसेच, परिक्षेला प्रवेश दिलेल्या उमेदवारांना परिक्षेस उपस्थित राहणेकरिता विहीत तारखेस कार्यमुक्त करावे. उमेदवारांना परिक्षेस उपस्थित राहणेकरिता पहिल्या दोन संधींकरिता (First two chances) प्रवासभत्ता व दैनंदिन भत्ता अनुज्ञेय राहील.

सोबत : वरीलप्रमाणे.

(एस. एस. नारखेडे)
कुलसचिव

**प्रत माहिती आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.**

१. शिक्षण संचालक/संशोधन संचालक/विस्तार शिक्षण संचालक/नियंत्रक/विद्यापीठ अभियंता /उपकुलसचिव (परीक्षा/सामान्य)/सहाय्यक कुलसचिव (प्रशासन—१)/सहाय्यक नियंत्रक(१)

/अधिदान व लेखा अधिकारी, पूर्व लेखा परिक्षण पथक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

२. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली/कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली/वनशास्त्र महाविद्यालय, दापोली/मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरी/उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे/काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला—रोहा/निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ.बा.सा.को.कृ.वि., दापोली.

३. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले/प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत.

४. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

५. संशोधन अधिकारी, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा, मुंबई.

६. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, रत्नागिरी.

७. खार जमीन शास्त्रज्ञ, खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल, जि. रायगड.

८. कृषि विद्यावेत्ता, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र भाटये./कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट.

९. उद्यानविद्यावेत्ता, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, गिर्ये, जि. सिंधुदूर्ग.

१०.प्राचार्य, मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव—रत्नागिरी/कृषि तंत्र विद्यालय, लांजा./कृषि तंत्र विद्यालय, रोहा.

११.प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती कार्यशाळा, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली./कृषि संशोधन केंद्र, आवाशी/कृषि संशोधन केंद्र, शिरगांव/कृषि संशोधन केंद्र, मुळदे/पशुधन प्रक्षेत्र, निळेली/सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन/कृषि संशोधन केंद्र, रेपोली/कृषि संशोधन केंद्र, पालघर.

१२.वसतिगृह प्रमुख, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी.

१३. विभाग प्रमुख — उद्यानविद्या विभाग/कृषि विद्या विभाग/पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग/कृषि वनस्पतीशास्त्र विभाग/कृषि रसायन आणि मृदशास्त्र विभाग/वनस्पती विकृती शास्त्र विभाग/कृषि किटकशास्त्र विभाग/कृषि अभियांत्रिकी विभाग/कृषि अर्थशास्त्र विभाग/विस्तार शिक्षण विभाग.

१४. अधिदान व लेखा अधिकारी, पूर्व लेखा परिक्षण पथक, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव/प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ला/प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत.

१५.ग्रंथालय प्रमुख, विद्यापीठ ग्रंथालय, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

१६.विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

१७.व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

१८.सुरक्षा अधिकारी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

१९.मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक, डॉ.बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

२०.सचिव, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ, कृषि परिषद, पुणे.

२१.प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

२/— सदरचे परिपत्रक व त्यासंदर्भातील सर्व परिशिष्ट विद्यापीठ संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करावी.

**'परिशिष्ट - अ'**

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## ३४ व्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षेकरिता प्रवेश दिलेल्या उमेदवारांचा तपशील.

| अ. क्र. | आसन क्रमांक | उमेदवारांची नावे | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ८७४ | डॉ. बनसोडे प्रविण बंकटी,<br>सहाय्यक प्राध्यापक | कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली. |
| २ | ८७५ | डॉ. बाविसकर सपना भगवानजी,<br>कनिष्ठ वनस्पती शरीर क्रिया शास्त्रज्ञ | प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले. |
| ३ | ८७६ | श्री. बेळंके रमेश शिवाजी,<br>लिपीक | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला–रोहा. |
| ४ | ८७७ | श्री. भाटकर प्रसाद ओमप्रकाश,<br>लिपीक | मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी. |
| ५ | ८७८ | डॉ. भोसले निलिमा दिलीपराव,<br>सहाय्यक प्राध्यापक | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे. |
| ६ | ८७९ | श्री. चेके मदन सुभाष,<br>कनिष्ठ लिपीक | कृषि संशोधन केंद्र, रेपोली. |
| ७ | ८८० | श्री. दळवटकर विनायक रघुनाथ,<br>प्रयोगशाळा सहाय्यक | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला–रोहा. |
| ८ | ८८१ | श्रीमती डांगे स्वाती दशरथ,<br>लिपीक | किटकशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली. |
| ९ | ८८२ | डॉ. देशमुख स्मिता वसंत,<br>सहाय्यक प्राध्यापक | मृद व रसायनशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली. |
| १० | ८८३ | श्रीमती दीक्षित पौर्णिमा पुरूषोत्तम,<br>लिपीक | आस्थापना–ब शाखा, डॉ. बा.सा.को.कृ. वि.दापोली. |
| ११ | ८८४ | श्री. गवळी अनिल साहेबराव,<br>सहाय्यक प्राध्यापक | वनशास्त्र महाविद्यालय, दापोली. |
| १२ | ८८५ | श्रीमती गवळी योगिता दत्ताराम,<br>ग्रंथालय सहाय्यक | विद्यापीठ ग्रंथालय, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली. |
| १३ | ८८६ | डॉ. गभाले लहानू किसन,<br>सहाय्यक प्राध्यापक | कृषि संशोधन केंद्र, पालघर. |
| १४ | ८८७ | डॉ. गुडधे प्रज्ञा सुरेश,<br>सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता | मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली. |
| १५ | ८८८ | श्री. हरावडे मनोहर पांडुरंग,<br>सहाय्यक सुरक्षा अधिकारी | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला–रोहा. |
| १६ | ८८९ | श्रीमती जाधव राणी मधुकर,<br>सहाय्यक प्राध्यापक | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला–रोहा. |
| १७ | ८९० | श्री. जाधव राकेश राहूल,<br>सहाय्यक प्राध्यापक | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| १८ | ८९१ | श्री. जारवाल गजानंद कारभारी,<br>लिपीक | सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, जि. रायगड. |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १९ | ८९२ | श्री. कदम गणेश गंगाराम, प्रयोगशाळा सहाय्यक | कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली. |
| २० | ८९३ | श्री. काकडे सुधीर मधुकर, पशुधन पर्यवेक्षक | पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली. |
| २१ | ८९४ | श्री. कांबळे सुशिल चंद्रकांत, गियर टेक्निशियन | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| २२ | ८९५ | श्री. काझी तौसिफ गौसमोहीद्दीन, सहाय्यक प्राध्यापक | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| २३ | ८९६ | श्री. खाडे सतिश तुकाराम, वरिष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| २४ | ८९७ | श्री. लाड योगेश लक्ष्मीकांत, कनिष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| २५ | ८९८ | श्री. मिरजकर निलेश बाळकृष्ण, सहाय्यक प्राध्यापक | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| २६ | ८९९ | श्री. मुखेडकर माताप्रसाद व्यंकटराव, सहाय्यक ग्रंथपाल | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला—रोहा. |
| २७ | ९०० | श्री. मुल्लाणी ईरशाद गौस, कनिष्ठ अभियंता | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे. |
| २८ | ९०१ | श्री. मुंदडा महेशकुमार कचरूलाल, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी. |
| २९ | ९०२ | कु. मुतवल्ली रूबीना मिरासाहेब, लिपीक | शिक्षण शाखा, कृषि महाविद्यालय, दापोली. |
| ३० | ९०३ | श्री. पतंगे गजानन सौदागर, सहाय्यक प्राध्यापक | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे. |
| ३१ | ९०४ | श्री. पाटील मयुरेश भुजंगराव सहाय्यक प्राध्यापक | कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली. |
| ३२ | ९०५ | श्री. पावसकर सचिन दिवाकर, लिपीक | लेखा—१ शाखा, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली. |
| ३३ | ९०६ | डॉ. रामोड संदीप श्रीरंगराव, सहाय्यक प्राध्यापक | पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली. |
| ३४ | ९०७ | डॉ. रणवीर राहूल चुडामन, सहयोगी प्राध्यापक | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला—रोहा. |
| ३५ | ९०८ | श्री. राठोड निखिल भोजराज, सहाय्यक प्राध्यापक | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला—रोहा. |
| ३६ | ९०९ | डॉ. सैतवाल योगश सुधाकर, सहाय्यक प्राध्यापक | महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ, कृषि परिषद, पुणे. |
| ३७ | ९१० | श्री. साळवे प्रफुल्लकुमार मारोतीराव, सहाय्यक प्राध्यापक | कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली. |
| ३८ | ९११ | डॉ. सणस मैथिलीश प्रकाश, कनिष्ठ उद्यानविद्यावेत्ता | प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले. |
| ३९ | ९१२ | श्रीमती संखे निकीता निलेश, लिपीक | कृषि संशोधन केंद्र, पालघर. |
| ४० | ९१३ | श्री. सावंत विनायक रमेश, लिपीक | शिक्षण संचालनालय, डॉ. बा.सा.को.कृ. वि., दापोली. |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ४१ | ९१४ | श्री. शेख इसाक नबीसाब, अनुरेखक | बांधकाम शाखा, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली. |
| ४२ | ९१५ | श्री. शिंदे मोहित राजेंद्र, शारीरिक प्रशिक्षण निदेशक | जिमखाना विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली. |
| ४३ | ९१६ | श्री. शिरसाठ रविकिरण अशोक, लिपीक | सामान्य शाखा, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली. |
| ४४ | ९१७ | डॉ. त्रिपाठी विश्वदीपक, सहाय्यक प्राध्यापक | वनशास्त्र महाविद्यालय, दापोली. |
| ४५ | ९१८ | डॉ. तुमडाम जया सुरेश, सहाय्यक प्राध्यापक | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे |
| ४६ | ९१९ | श्री. झगडे विराज विष्णू, सहाय्यक प्राध्यापक | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला—रोहा. |

*****

**‘परिशिष्ट - ब’**

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## ३४ व्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षेपूर्वी झालेल्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणांनुसार संबंधीत विषयात सूट दिलेल्या उमेदवारांची नावे व त्याबाबतचा तपशील.

| अ. क्र. | आसन क्रमांक | उमेदवारांची नावे | प्रश्नपत्रिका क्र.१ | | प्रश्नपत्रिका क्र.२ | | प्रश्नपत्रिका क्र.३ | | कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भाग १ | भाग २ | भाग १ | भाग २ | भाग १ | भाग २ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ८५९ | श्री. चांदोरकर किरण चंद्रकांत, लिपीक | | | | | | | कृषि तंत्र विद्यालय, रोहा. |
| २ | ८०८ | श्री. देबाजे प्रशांत प्रल्हादराव, वरिष्ठ संशोधन सहाय्यक | सूट | सूट | सूट | सूट | सूट | | का.प.व्य.प.संस्था, किल्ला—रोहा. |
| ३ | ८४० | श्रीमती जाधव स्मिता शैलेश (पवार छबू काशिनाथ)वरिष्ठ लिपीक | | | | | | | विस्तार शिक्षण विभाग, कृ.म.वि., दापोली. |
| ४ | ८१९ | श्री. कदम ऋतुज रविंद्र, लिपीक | सूट | सूट | सूट | सूट | | | लेखा शाखा, कृ.म. वि., दापोली. |
| ५ | ६३६ | कदम प्रविण वसंत, अनुरेखक | | | | | सूट | सूट | बांधकाम, दक्षिण उपविभाग, शिरगांव, रत्नागिरी. |
| ६ | ८६३ | श्री. खुपटे देवानंद बबन, सहाय्यक ग्रंथपाल | सूट | | सूट | सूट | | | विद्यापीठ ग्रंथालय, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली |
| ७ | ८२७ | श्रीमती कुडाळकर सानिका सुशांत, लिपीक | | | | | सूट | | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे. |
| ८ | ८६२ | श्री. काळे समीर नरेंद्र, सहाय्यक प्राध्यापक | सूट | सूट | | | सूट | सूट | प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला. |
| ९ | ८३८ | श्री. पाटील संदिप शिवाजी, अनुरेखक | | | सूट | सूट | सूट | सूट | काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला—रोहा |
| १० | ८६८ | श्री. पूर्वे प्रदिप अनंता, लिपीक | | | | सूट | | सूट | विद्यार्थी कल्याण, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली |
| ११ | ८४४ | श्री. रणदिवे प्रविण परमेश्वर, वरिष्ठ लिपीक | सूट | सूट | सूट | सूट | सूट | | उच्चस्तर परिक्षा शाखा, डॉ.बा.सा. को.कृ.वि.दापोली. |
| १२ | ७८१ | श्री. राठोड विनोद रोहिदास, अनुरेखक | सूट | सूट | | | | | प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत |
| १३ | ८७० | श्री. तांबे प्रशांत शांताराम, लिपीक | सूट | | सूट | सूट | सूट | सूट | मत्स्य महाविद्यालय, शिरगाव. |
| १४ | ८७१ | डॉ. उईके गिरीश रामराव, सहा. प्राध्यापक | सूट | सूट | | सूट | सूट | सूट | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे |

टिप :— जेथे उमेदवारांच्या नावासमोर सूट असे नमूद केलेले नाही त्या विषयाच्या परिक्षेस उमेदवारांने बसणे आवश्यक आहे.

*****

## ‘परिशिष्ट - क’

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## ३४ व्या विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचा कार्यक्रम.

**परिक्षेचा दिवस व दिनांक :- शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ ते रविवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७**

**परिक्षेचे ठिकाण :- कृषि महाविद्यालय, दापोली, ता. दापोली, जि. रत्नागिरी.**

## वेळापत्रक

| अ.क्र. | विषय व भाग | गुण | वेळ | अभ्यासक्रम | पुस्तके |
|---|---|---|---|---|---|
| **शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ प्रश्नपत्रिका क्र.१ — १०० गुण** | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | अधिनियम व परिनियम — भाग १ (पुस्तकासह) | ५० | सकाळी १०.०० ते ११.३० | १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (कृषि विद्यापीठे) अधिनियम—१९८३ आणि त्या आधारे तयार केलेले परिनियम—१९९० | १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे (कृषि विद्यापीठे) अधिनियम—१९८३ (सुधारित)<br>२. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे (कृषि विद्यापीठे) परिनियम—१९९० (सुधारणेसह) |
| २. | विद्याविषयक बाबी — भाग २ (पुस्तकासह) | ५० | दुपारी १५.०० ते १६.३० | १. विद्यापीठात चालविले जाणारे कृषि विषयाचे अभ्यासक्रम.<br>२. गुणभार पध्दत, त्रिसत्र आणि सत्र, विद्यार्थ्यांचे अभिलेख ठेवणे.<br>३. प्रवेश प्रक्रिया (सर्व अभ्यासक्रम व आरक्षण)<br>४. वसतिगृह प्रशासन<br>५. शिष्यवृत्ती आणि विद्यावेतन<br>६. विद्यार्थी कल्याण | १. विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले ठराव, नियम आणि आदेश. |

## शनिवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१७
## प्रश्नपत्रिका क्र.२ — १०० गुण

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १. | लेखा विषयक — भाग १ (पुस्तकासह) | ५० | सकाळी १०.०० ते ११.३० | १. वित्तीय नियमावली/नियम आणि लेखा संहिता.<br>२. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी/अंशदान भविष्य निर्वाह निधी<br>३. आकस्मिक खर्च<br>४. अंदाजपत्रक<br>५. विद्यापीठातील अर्थविषयक बाबी/विद्यापीठ निधी हाताळणे. | १. विद्यापीठ लेखा संहिता<br>२. मुंबई वित्तीय नियम — १९५९<br>३. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम — १९६५<br>४. अंदाजपत्रक नियमावली (महाराष्ट्र शासन) |
| २. | सर्वसाधारण लेखाविषयक बाबी — भाग २ (पुस्तकाशिवाय) | ५० | दुपारी १५.०० ते १६.३० | १. जमा आणि खर्चाच्या ताळमेळासहित लेखा द्विनोंदणी पध्दत<br>२. कार्यालयीन व्यवस्थापनासाठी शासन/विद्यापीठाने निर्गमित केलेले नियम<br>३. इंग्रजी लेखन/मसुदा/सारांश लेखन इत्यादी. | १. द्विनोंदणी पध्दतीमधील प्रथम पायरी (जे.आर. बोटलीबॉय)<br>२. लिपीकवर्गीय कर्मचारी यांचे प्रशिक्षण पुस्तक (लिपीकवर्गीय भाग—४) (महाराष्ट्र शासन)<br>३. महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभाग कार्यालयीन पध्दतीची पुस्तिका. |

## रविवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७
## प्रश्नपत्रिका क्र.३ — १०० गुण

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सेवाविषयक नियम — भाग १ (पुस्तकासह) | ५० | सकाळी १०.०० ते ११.३० | १. सेवाविषयक नियम | १. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सर्व)<br>२. विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम आणि आदेश |
| २. | शिस्त व वर्तणूक नियम — भाग २ (पुस्तकासह) | ५० | दुपारी १५.०० ते १६.३० | १. विद्यापीठ कर्मचारी यांचे भरतीचे नियम, कंत्राटी नेमणूक किंवा प्रतिनियुक्ती व सेवाजेष्ठता इत्यादी बाबतचे नियम<br>२. विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांचे शिस्त व वर्तणूकीबाबतचे नियम व विभागीय चौकशी. | १. विद्यापीठाने वेळोवेळी तयार केलेले नियम<br>२. विद्यापीठ प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले नियम आणि आदेश<br>३. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९<br>४. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ |



*****

**'परिशिष्ट - ड'**

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## परिक्षेच्या वेळी उमेदवारांनी पालन करावयाच्या सूचना

**उमेदवारांनी खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यांचे परिक्षेच्या वेळी पालन करावे.**

१. परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर उमेदवाराने परिक्षेच्या दालनामध्ये उपस्थित रहावे. परीक्षा सुरु झाल्यानंतर उशिराने येणाऱ्या उमेदवाराला परिक्षेकरिता अतिरिक्त वेळ दिला जाणार नाही.

२. परिक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे. परिक्षेच्या कालावधीत यावरुन उमेदवाराची ओळख पटविली जाईल.

३. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील सर्व नोंदी परीक्षा सुरु होण्यापूर्वी उमेदवाराने अचूक भरणे आवश्यक आहे. काही त्रुटी राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील व या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

४. परिक्षेकरिता आवश्यक असणाऱ्या उत्तरपत्रिका तसेच पुरवण्या उमेदवारांना परिक्षेच्या दालनामध्ये पुरविण्यांत येतील. मात्र, लेखनसाहित्य उमेदवाराने स्वत: आणणे आवश्यक राहील.

५. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील तपशिलाखेरीज उत्तरपत्रिकेच्या आतील कोणत्याही पृष्ठांवर उमेदवाराने त्याचे नांव, आसन क्रमांक, काही विशिष्ट प्रकारच्या खूणा अथवा शब्दप्रयोग लिहू नयेत.

६. उमेदवाराने परिक्षेच्या कालावधीत दिलेल्या विषयाच्या प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लिखाण चिन्हांकन करु नये.

७. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस उत्तरपत्रिका सोडविण्यास सुरुवात करु नये ते पृष्ठ कोरे सोडवण्यांत यावे.

८. मुखपृष्ठ व त्यामागील बाजू सोडून इतर सर्व पृष्ठांवर दोन्ही बाजूस लिखाण करावे.

९. परीक्षा संपण्याच्या वेळेपूर्वी १० मिनिटे अगोदर उमेदवारांनी पुरवण्या उत्तरपत्रिकेसोबत बांधून घ्याव्यात.

१०.परिक्षेच्या वेळापत्रकानुसार प्रत्येक पेपर सुरु होण्याच्या वेळी घंटा वाजवण्यात येईल. तसेच, पेपर संपण्यापूर्वी दहा मिनिटे अगोदर इशारा देणारी घंटा व पेपरची वेळ संपल्यानंतर दीर्घ वेळेची घंटा वाजवण्यांत येईल.

११.परीक्षा संपण्यापूर्वी अर्धा तास अगोदर उमेदवाराला त्याची उत्तरपत्रिका द्यावयाची झाल्यास ती त्यांनी समवेक्षकाकडे सुपूर्त करावी.

१२.परीक्षा संपल्यानंतर पर्यवेक्षक अथवा समवेक्षक यांनी परवानगी दिल्याखेरीज जागा सोडू नये.

१३.परीक्षेच्या दालनामध्ये धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.

१४.उमेदवारांनी परिक्षेच्या वेळी भ्रमण दूरध्वनी (मोबाईल), मायक्रोफोन, डिजीटल डायरी, पेजर, गणक यंत्र (कॅल्क्युलेटर) या सारखी उपकरणे जवळ बाळगू नयेत.

१५.परिक्षेच्या दिवशी दोन विषयांच्या दरम्यान असलेल्या मध्यांतराच्या कालावधीत परिक्षेच्या दालनामध्ये खाद्यपदार्थ खाण्यास मनाई आहे.

१६.परिक्षेच्या वेळी कोणत्याही प्रकारणे आक्षेपार्ह वर्तन (कोणत्याही प्रकारे कॉपी करणे/अन्य उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतून अथवा त्यांचेशी चर्चा करुन उत्तर लिहिणे इत्यादी) करणाऱ्या परीक्षार्थ्यांस परिक्षेत अनुत्तीर्ण घोषित करण्यांत येइल. तरी उमेदवारांनी याबाबत कटाक्षाने दक्षता घ्यावी.

*****